मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# हिंजवडी आयटी पार्क पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या ताब्यात!

## वाहतूक कोंडीला 'ब्रेक', प्रशस्त रस्ते अन् ड्रेनेज-पाणीपुरवठ्याला गती!

» पिंपरी | प्रतिनिधी

**हिंजवडी आयटी पार्कमधील वर्षानुवर्षांच्या नागरी समस्यांना आता पूर्णविराम मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. हिंजवडी आयटी पार्कचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केला आहे. मंगळवारी (दि. १) 'पुढारी न्यूज महासमीट २०२६'च्या मुलाखतीदरम्यान मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केली. या निर्णयामुळे हिंजवडी परिसरातील वाहतूक कोंडी, अपुऱ्या नागरी सुविधा, अनियंत्रित बांधकामे, पाणीपुरवठा, ड्रेनेज, घनकचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक वाहतुकीच्या प्रश्नांना कायमस्वरूपी तोडगा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.**



### 'एकहाती नियंत्रण' मिळाल्याने विकासाला गती!

सध्या हिंजवडी परिसरात ग्रामपंचायत, एमआयडीसी आणि पीएमआरडीए अशा विविध यंत्रणांची भूमिका आहे. त्यामुळे एखाद्या विकासकामासाठी अनेक विभागांमध्ये समन्वय साधावा लागतो. परिणामी, कामांना विलंब होण्याबरोबरच जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्नही निर्माण होतो.महापालिकेत समावेश झाल्यानंतर रस्ते, ड्रेनेज, पाणीपुरवठा, उद्याने, स्वच्छता, सुशोभीकरण, वाहतूक सुविधा आणि इतर नागरी कामांचे नियोजन एकाच प्रशासनाच्या माध्यमातून करता येणार आहे. त्यामुळे विकासकामांना गती मिळण्याची अपेक्षा आहे.

पिंपरी-चिंचवड शहराच्या अगदी सीमेला लागून असलेले हिंजवडी आयटी पार्क हा देशातील महत्त्वाच्या आयटी हबपैकी एक आहे. हजारो आयटी कंपन्या आणि लाखो कर्मचारी या परिसराशी जोडलेले आहेत. मात्र, एवढ्या मोठ्या आर्थिक केंद्राचा विकास मात्र अनेक वर्षापासून विविध प्रशासकीय यंत्रणांच्या कचाट्यात अडकला आहे. हिंजवडी परिसरात ग्रामपंचायत, एमआयडीसी, पीएमआरडीए अशा विविध यंत्रणांचे अधिकार असल्याने विकासकामांमध्ये समन्वयाचा अभाव निर्माण झाला. त्याचा थेट फटका आयटी कंपन्या, कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांना बसत आहे.

महापालिकेत समावेश झाल्यानंतर या भागाच्या विकासासाठी एकाच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून नियोजन आणि अंमलबजावणी करता येणार आहे. त्यामुळे रस्ते, पाणी, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक वाहतूक आणि इतर मूलभूत सुविधांच्या प्रश्नांना अधिक वेगाने हाताळता येण्याची शक्यता आहे.हिंजवडी आयटी पार्कची सर्वात मोठी समस्या म्हणजे दिवसेंदिवस वाढत जाणारी वाहतूक कोंडी. आयटी कंपन्यांची संख्या, कर्मचारी आणि वाहनांची संख्या झपाट्याने वाढली; मात्र त्या तुलनेत रस्ते आणि वाहतूक व्यवस्थेचा विकास झालेला नाही. परिणामी, सकाळ-संध्याकाळच्या वेळेत हिंजवडी परिसरातील प्रमुख रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात.

आयटी पार्क म्हणून जागतिक स्तरावर ओळख निर्माण केलेल्या हिंजवडी परिसरात अद्यापही मूलभूत नागरी सुविधांची पुरेशी उपलब्धता नसल्याची स्थिती आहे. काही भागात पाणीपुरवठा, सांडपाण्याचा निचरा, ड्रेनेज व्यवस्था आणि घनकचरा व्यवस्थापनाच्या समस्या कायम आहेत.

महापालिकेच्या माध्यमातून या सुविधा एकत्रितपणे विकसित करता येणार असल्याने नागरिकांना आणि आयटी कंपन्यांना मोठा फायदा होण्याची शक्यता आहे.

परिणामी, पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या विविध भागांतून दररोज हिंजवडीकडे होणारी मोठी वाहतूक काही प्रमाणात कमी होण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे आयटी पार्कचा विकास आणि पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार यांच्यात अधिक चांगला समन्वय साधण्याची संधी निर्माण झाली आहे.

# महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पवना धरणावर जलपूजन!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड शहराला वर्षभर पुरेसा आणि सुरळीत पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणाने पूर्ण क्षमतेने पाणीसाठा गाठल्यानंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पारंपरिक पद्धतीने जलपूजन करण्यात आले. महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते जलपूजन करून जलदेवतेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी शहराला वर्षभर पुरेसा, नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा व्हावा, यासाठी प्रार्थना करण्यात आली.**



पवना धरण हे पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे जलस्रोत आहे. यंदा धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने शहराच्या पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने समाधानकारक परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर जलपूजनाच्या माध्यमातून जलस्रोतांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासोबतच पाण्याचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा संदेश देण्यात आला.

जलपूजनाच्या निमित्ताने जलस्रोतांचे संवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर, नदीपात्राची स्वच्छता आणि जलपरिसराचे संरक्षण करण्याचा संकल्प करण्यात आला. पाणी ही केवळ नैसर्गिक संपत्ती नसून शहराच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची गरज असल्याने उपलब्ध जलसाठ्याचे जतन करणे आणि त्याचा योग्य वापर करणे ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

जलपूजनाचा कार्यक्रम पर्यावरणपूरक पद्धतीने पार पाडण्यात आला. धरण परिसर तसेच नदीपात्र स्वच्छ ठेवणे, जलप्रदूषण टाळणे आणि जलस्रोतांच्या स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला. पवना नदी व धरण परिसराची स्वच्छता आणि जलस्रोतांचे संरक्षण यासाठी नागरिकांनीही सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.

पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येच्या गरजा लक्षात घेता भविष्यातील पाणी व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी जलस्रोतांचे नियोजनबद्ध संवर्धन, पाण्याची बचत आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर यावर भर देणे आवश्यक आहे. यासाठी महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून विविध उपाययोजना राबविण्यात येत असून नागरिकांनीही पाणी बचतीच्या सवयी अंगीकाराव्यात, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरीदे, जलसंपदा विभागाचे रजनीश भारिया यांच्यासह पिंपरी-चिंचवड शहर व परिसरातील पत्रकार बंधू-भगिनी, महापालिका अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

जलपूजनाच्या माध्यमातून पाण्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतानाच 'पाणी वाचवा, जलस्रोत जपा आणि भावी पिढ्यांसाठी जलसुरक्षित शहर घडवा' हा संदेश देण्यात आला.

# हिंजवडीचा कोंडमारा थांबवा; सात गावे तातडीने PCMCमध्ये घ्या!

## खासदार बारणे आक्रमक; हिंजवडीसाठी मेट्रोसह तातडीच्या उपाययोजनांची मागणी!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**हिंजवडी आयटी पार्क व परिसरातील गंभीर समस्यांचे तातडीने निराकरण करावे. हिंजवडी, माण, मारुंजी, नेरे, जांभे, सांगवडे व गहुंजे परिसराचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत तातडीने समावेश करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी राज्य शासनाकडे केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांना खासदार बारणे यांनी निवेदन दिले आहे.**





### हिंजवडीच्या समस्यांवर आता 'संयुक्त' कृती आराखडा!

पीएमआरडीए, एमआयडीसी, पिंपरी-चिंचवड महापालिका, मेट्रो प्रशासन, वाहतूक पोलीस व संबंधित सर्व विभागांची तातडीची संयुक्त बैठक आपल्या स्तरावर आयोजित करावी. या बैठकीमध्ये हिंजवडी आयटी पार्क व परिसरातील वाहतूक, रस्ते, कचरा व्यवस्थापन, अतिक्रमण, सार्वजनिक वाहतूक व इतर पायाभूत सुविधांच्या समस्यांवर कालबद्ध कृती आराखडा निश्चित करण्याबरोबरच सदर परिसर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत समाविष्ट करण्याबाबत ठोस निर्णय घेण्यात यावा. हिंजवडी आयटी पार्क हे महाराष्ट्राच्या औद्योगिक व माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचे केंद्र आहे. त्यामुळे या परिसरातील समस्या केवळ स्थानिक नागरिकांच्या नसून राज्याच्या औद्योगिक विकासाशी संबंधित आहेत. शासनाने याची तातडीने दखल घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, अशी विनंती खासदार बारणे यांनी केली आहे.

हिंजवडी आयटी पार्कमधील रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी, अपुरी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, अतिक्रमणे, कचरा व्यवस्थापनाचा अभाव तसेच पायाभूत सुविधांची कमतरता यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

या संदर्भात मी गेल्या वर्षी स्वतः पीएमआरडीए आयुक्त यांच्यासोबत बैठक घेऊन हिंजवडी एमआयडीसी परिसरातील रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणे, ज्या-ज्या चौकांमध्ये सातत्याने वाहतूक कोंडी होते. त्या ठिकाणी आवश्यकतेनुसार उड्डाणपूल अथवा इतर वाहतूक उपाययोजना करणे, तसेच परिसरातील अतिक्रमणे हटविणे याबाबत सूचना केल्या होत्या. त्यानंतरही या समस्यांवर अपेक्षित स्वरूपात ठोस कार्यवाही झालेली नाही. संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पत्रव्यवहार करूनही परिस्थितीत लक्षणीय सुधारणा झालेली दिसून येत नसल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

हिंजवडी आयटी पार्कमध्ये देशभरातील मोठ्या आयटी कंपन्या कार्यरत असून, मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. मात्र, पायाभूत सुविधांच्या अभावामुळे या परिसराची ओळख आता वाहतूक कोंडी आणि नागरिकांच्या समस्यांसाठी होत आहे. दररोज सकाळी व सायंकाळी होणाऱ्या प्रचंड वाहतूक कोंडीमुळे कर्मचारी व नागरिकांचा मोठ्या प्रमाणात वेळ वाया जात असून, त्याचा परिणाम उद्योग आणि रोजगाराच्या वातावरणावरही होत असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो प्रकल्प हा या परिसरातील वाहतूक समस्येवर महत्त्वाचा उपाय ठरू शकतो. या मार्गाची चाचणी झालेली असतानाही प्रत्यक्ष प्रवासी सेवा अद्याप सुरू झालेली नाही. मेट्रो सेवा तसेच इतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम आणि नियमित झाल्यास हिंजवडी आयटी पार्कमधील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होईल. त्यामुळे मेट्रो सेवा लवकरात लवकर सुरू करण्याच्या दृष्टीने संबंधित विभागांना आवश्यक निर्देश देण्यात यावेत.

हिंजवडी परिसरातील रस्ते, वाहतूक व्यवस्था, अतिक्रमणे, कचरा व्यवस्थापन आणि इतर नागरी सुविधांबाबत पीएमआरडीए, एमआयडीसी, पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महानगरपालिका, वाहतूक पोलीस व संबंधित सर्व विभागांची संयुक्त बैठक घेऊन कायमस्वरूपी उपाययोजना निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. हिंजवडी आयटी पार्कसह हिंजवडी, माण, मारुंजी, नेरे, जांभे, सांगवडे व गहुंजे या झपाट्याने विकसित होत असलेल्या परिसराचा पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत समावेश करण्यात यावा, अशी मागणी खासदार बारणे यांनी केली.

या परिसराचा पिंपरी-चिंचवड शहराशी सामाजिक, आर्थिक व दळणवळणाच्या दृष्टीने जवळचा संबंध आहे. या भागाचा महानगरपालिकेत समावेश झाल्यास रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, सार्वजनिक आरोग्य, पथदिवे, अग्निशमन, वाहतूक व्यवस्थापन व इतर आवश्यक नागरी सुविधा नियोजनबद्ध पद्धतीने उपलब्ध करून देणे शक्य होईल. या परिसराचा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत समावेश करण्याबाबत महानगरपालिकेच्या स्तरावर ठरावही करण्यात आलेला आहे. त्यामुळे शासनाने या विषयाकडे गांभीर्याने पाहून प्रशासकीय प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

# बीएसएनएल डक्टमधील मृत्यूंनी खळबळ; दोषींवर गुन्हे दाखल करा!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**"निगडी प्राधिकरण येथील बीएसएनएल डक्टमधील मजूर मृत्यूप्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी," अशी मागणी कष्टकरी संघर्ष महासंघाने केली आहे. या प्रकरणी गुरुवारी पुकारलेल्या आंदोलनापूर्वीच पोलिसांनी मध्यस्थी केल्याने बीएसएनएल अधिकारी आणि महासंघ यांच्यात निगडी पोलिस ठाण्यात चर्चा झाली. या वेळी पोलिस निरीक्षक चंद्रकांत जाधव, महासंघाचे अध्यक्ष काशिनाथ नखाते, पुणे बीएसएनएलचे महाव्यवस्थापक अतुल वाखले, उप महाव्यवस्थापक श्रीकांत नंदेश्वर, वीरेंद्र चौधरी यांच्यासह राजेश माने, राजू बिराजदार, माधुरी जलमूलवार आदी उपस्थित होते.**



या वेळी पोलिस निरीक्षक चंद्रकांत जाधव, कष्टकरी संघर्ष महासंघाचे अध्यक्ष काशिनाथ नखाते, पुणे बीएसएनएलचे महाव्यवस्थापक अतुल वाखले, उपमहाव्यवस्थापक श्रीकांत नंदेश्वर, वीरेंद्र चौधरी यांच्यासह राजेश माने, राजू बिराजदार, माधुरी जलमूलवार आदी उपस्थित होते. बैठकीदरम्यान मजुरांच्या सुरक्षेचा प्रश्न, अपघाताची कारणे, कामाच्या ठिकाणी आवश्यक असलेल्या सुरक्षा उपाययोजना आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. वारंवार होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची मागणी महासंघाच्या वतीने करण्यात आली.

बीएसएनएल डक्टमध्ये मागील वर्षी तीन मजुरांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आता पुन्हा दोघांचा मृत्यू झाल्याने या ठिकाणी मजुरांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. एकाच ठिकाणी वारंवार अपघात होत असल्याने संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. या प्रकरणातील दोषी ठेकेदार, संबंधित महापालिका अधिकारी आणि बीएसएनएल अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी महासंघाने केली. तसेच, डक्टमध्ये काम करणाऱ्या मजुरांना आवश्यक सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्यासह कामाच्या ठिकाणी सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली.मागील घटनेतील तीन मृत मजुरांच्या वारसांना अर्थसहाय्य देण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे बीएसएनएल अधिकाऱ्यांनी सांगितले. मृतांच्या कुटुंबीयांना आवश्यक ती मदत मिळावी, यासाठी प्रक्रिया सुरू असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

> "या ठिकाणी दुसऱ्यांदा अपघात घडला आहे. या प्रकरणाची चौकशी करून गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे. जबाबदारी निश्चित करण्याचे काम पोलिसांनी करावे. अशा घटना रोखण्यासाठी बीएसएनएल प्रशासनाने उपाययोजना कराव्यात."
>
> - काशिनाथ नखाते, अध्यक्ष, कष्टकरी संघर्ष महासंघ

# नगरसेवक सचिन तापकीरांचा महापालिकेला इशारा!

## विकासकाची चूक सोसायटीच्या माथी नको; पुनर्वापर करणाऱ्यांना सवलत द्या!

» पिंपरी | प्रतिनिधी

**महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत एसटीपी आणि जलनिःस्सारण जोडणी शुल्क आकारण्याबाबतचा प्रस्ताव समोर आल्यानंतर या निर्णयावर पुनर्विचार करण्याची मागणी नगरसेवक सचिन तापकीर यांनी केली आहे. प्रस्तावित शुल्कामुळे गृहनिर्माण सोसायट्यांमधील नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा पडू नये, यासाठी त्यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे.**



प्रस्तावात निवासी वापरासाठी प्रति गाळा ५०० रुपये आणि जलनिःस्सारण जोडणीसाठी स्वतंत्र १ लाख १० हजार रुपये शुल्काचा उल्लेख आहे. त्यामुळे एकाच व्यवस्थेसाठी दोन वेगवेगळ्या स्वरूपाची आकारणी होणार आहे का, याबाबत महापालिकेने स्पष्टता करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांवर कोणत्याही प्रकारे दुहेरी आर्थिक भार पडणार नाही, याची स्पष्ट तरतूद करण्याची मागणीही निवेदनात करण्यात आली आहे.

शुल्क भरण्याची जबाबदारी विकासकावर निश्चित करण्यात आली असली तरी, विकासकाने शुल्काची रक्कम भरली नाही तर भविष्यात त्याचा फटका संबंधित गृहनिर्माण सोसायटी आणि सदनिकाधारकांना बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे विकासकांकडून शुल्काची वसुली वेळेत करण्यासाठी प्रभावी आणि कायदेशीर यंत्रणा महापालिकेने निश्चित करावी, अशी भूमिका तापकीर यांनी मांडली आहे.

प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या पुनर्वापराचे अपेक्षित प्रमाण ५० टक्के असताना प्रत्यक्षात ते सुमारे ३० टक्केच असल्याची बाबही निवेदनात उपस्थित करण्यात आली आहे. ही तफावत नेमकी कशामुळे निर्माण झाली, याचा आढावा घेऊन संबंधित घटकांचे उत्तरदायित्व निश्चित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, ज्या गृहनिर्माण सोसायट्या प्रक्रिया केलेल्या पाण्याचा ५० टक्क्यांपेक्षा अधिक पुनर्वापर करतात, त्यांना शुल्कात सवलत किंवा अन्य स्वरूपाचे प्रोत्साहन द्यावे, अशी सूचनाही करण्यात आली आहे. केवळ दंडात्मक शुल्क आकारण्याऐवजी पर्यावरणपूरक उपाययोजनांना प्रोत्साहन देणारे धोरण अधिक परिणामकारक ठरेल, असे तापकीर यांनी म्हटले आहे. शुल्काच्या माध्यमातून जमा होणारा निधी कोणत्या कामांसाठी, किती प्रमाणात आणि कोणत्या पद्धतीने खर्च केला जाणार, याबाबतही महापालिकेने पारदर्शक व्यवस्था उभारावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

### विकासकाची चूक सोसायटीच्या माथी नको!

विकासकाने एसटीपी किंवा जलनिःस्सारण शुल्क भरले नाही, तर त्याचा आर्थिक बोजा संबंधित गृहनिर्माण सोसायटी अथवा सदनिकाधारकांवर टाकू नये. विकासकांकडून शुल्काची वसुली करण्यासाठी महापालिकेने स्वतंत्र आणि प्रभावी यंत्रणा उभारावी. तसेच प्रक्रिया केलेल्या पाण्याचा अधिकाधिक पुनर्वापर करणाऱ्या सोसायट्यांना शुल्कात सवलत देऊन प्रोत्साहन द्यावे, अशी मागणी नगरसेवक सचिन तापकीर यांनी केली आहे.

# फांद्या छाटण्याच्या नावाखाली ३४ झाडे मुळासकट तोडली!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने दिलेल्या वृक्ष छाटणीच्या परवानगीचा गैरवापर करत मोशी येथील 'स्वराज रेसिडेन्सी' गृहनिर्माण सोसायटीत तब्बल ३४ झाडांची मुळासकट बेकायदेशीर कत्तल करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.केवळ धोकादायक फांद्यांची छाटणी करण्याचे कारण पुढे करून पालिकेकडून रीतसर परवानगी मिळवण्यात आली होती; मात्र प्रत्यक्ष कामादरम्यान या सर्व अटी-शर्थी धाब्यावर बसवत हिरवीगार झाडे थेट बुंध्यापासून तोडून टाकण्यात आली.**





"मोशी येथील स्वराज सोसायटीमधील वृक्षतोडीसंदर्भात महापालिकेकडे तक्रार प्राप्त झाली आहे. सोसायट्यांमधील झाडांची छाटणी ही महापालिकेकडून न करता संबंधित अर्जदाराकडूनच केली जाते. मात्र, वर्क ऑर्डरमधील अटींनुसार ही छाटणी महापालिकेच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी समन्वय साधून आणि त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीतच करणे बंधनकारक असते, जेणेकरून झाडे मुळासकट तोडली जाणार नाहीत. या प्रकरणात प्राप्त तक्रारीची गंभीर दखल घेत संबंधित सुपरवायझरला प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी व पंचनामा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पंचनाम्याचा सविस्तर अहवाल हाती आल्यानंतर नियमांनुसार पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल."

- महेश गारगोटे, उद्यान अधीक्षक पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

"महानगरपालिका आणि उद्यान विभागाने वृक्ष प्राधिकरणाला बगल देत छाटणीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वृक्षतोडीची नवी पळवाट शोधून काढल्याचे दिसते. एकाच प्रकरणात तब्बल २३० झाडांच्या फांद्या धोकादायक दाखवून सरसकट तोडीची परवानगी दिली गेली, ज्याचा कोणताही ठोस किंवा सत्य पाहणी अहवाल अस्तित्वात नाही. त्यातही सोसायटीच्या अधिकृत लेटरहेडऐवजी वैयक्तिक अर्जावर आणि तोही संबंधित विभागाकडे नसताना परस्पर मंजुरी देणे हे प्रशासकीय नियमबाह्यतेचे लक्षण आहे."

- प्रशांत राऊळ, पर्यावरण प्रेमी .

एकीकडे पिंपरी-चिंचवड शहराचा हरित पट्टा वाढावा आणि पर्यावरणाचे संवर्धन व्हावे, यासाठी पर्यावरणप्रेमी सातत्याने झाडे लावण्यासोबतच त्यांचे संगोपन व जतन करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. दुसरीकडे महापालिका प्रशासनाकडूनही वृक्ष संवर्धन, वृक्षारोपण आणि हरित क्षेत्राच्या विकासासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांची तरतूद केली जाते. मात्र, या सर्व प्रयत्नांच्या पार्श्वभूमीवर शहरातच बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत असेल, तर प्रशासनाच्या वृक्ष संवर्धनाच्या धोरणावरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

वृक्षतोडीच्या अशा घटनांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी महापालिकेकडे यंत्रणा असतानाही प्रत्यक्षात बेकायदेशीर वृक्षतोडीचे प्रकार थांबत नसल्याची भावना पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे. नियमांचे उल्लंघन करून झाडे तोडणाऱ्यांवर कठोर कारवाई झाली नाही, तर भविष्यात अशा प्रकारांना आणखी प्रोत्साहन मिळण्याची भीतीही व्यक्त होत आहे. त्यामुळे केवळ परवानगी देणे आणि त्यानंतर कागदोपत्री कारवाई करण्याऐवजी प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी करून नियमांचे पालन होत आहे की नाही, यावर महापालिकेने कठोर देखरेख ठेवण्याची गरज आहे.

दरम्यान, स्वराज सोसायटीतील वृक्षतोडीची माहिती मिळताच महापालिकेच्या उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आणि पंचनामा तयार केला. मात्र, पंचनामा होऊनही एवढ्या मोठ्या प्रमाणावर झाडांची कत्तल करणाऱ्या अथवा करवून घेणाऱ्या संबंधितांवर अद्याप पोलिसांत कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याने संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे पंचनामा केल्यानंतर पुढील कारवाई नेमकी कधी होणार, संबंधितांवर दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई केली जाणार का, असा सवाल उपस्थित होत आहे.

झाडे तोडून झाल्यानंतर केवळ पंचनामा करून प्रशासनाची जबाबदारी संपणार का? असा संतप्त सवाल पर्यावरणप्रेमींकडून केला जात असून, दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

# ‘पिंपरी-चिंचवड महोत्सव 2026’ची जोरदार तयारी!

## स्थानिक कलाकार, बालकलाकार अन् गुणवंतांना मोठी संधी!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**औद्योगिक आणि आधुनिक शहर म्हणून वेगाने विकसित होत असलेल्या पिंपरी-चिंचवडची सांस्कृतिक ओळख अधिक समृद्ध करण्यासाठी ‘पिंपरी-चिंचवड महोत्सव २०२६’ आयोजित करण्यात येत आहे. शहराच्या कानाकोपऱ्यात दडलेल्या कलागुणांना शोधून त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणे, स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देणे आणि नागरिकांना विविध कलाविष्कारांचा आनंद देणे, हा या महोत्सवाचा प्रमुख उद्देश असल्याचे महापौर तथा महोत्सवाचे स्वागताध्यक्ष रवि लांडगे यांनी सांगितले.**



यावेळी महोत्सवाचे मुख्य संयोजक तथा आमदार अमित गोरखे, मुख्य संयोजक तथा विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांच्यासह विविध क्षेत्रांतील कलाकार, सांस्कृतिक संस्थांचे प्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवडमध्ये संगीत, नाट्य, नृत्य, लोककला, साहित्य, क्रीडा यांसह विविध क्षेत्रांत मोठी प्रतिभा आहे. अनेक कलाकारांकडे गुणवत्ता असूनही त्यांना आपली कला मोठ्या व्यासपीठावर सादर करण्याची अपेक्षित संधी मिळत नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी महोत्सवात नामवंत कलाकारांसोबतच स्थानिक व नवोदित कलाकारांना संधी उपलब्ध करून देण्यावर भर राहणार आहे तसेच बालकलाकार आणि विद्यार्थ्यांच्या सहभागालाही महोत्सवात विशेष महत्त्व दिले जाणार आहे. नाट्य परिषदेच्या माध्यमातून बालनाट्य, बालकलाकारांसाठी विविध उपक्रम तसेच मुलांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या स्पर्धांचे नियोजन करण्याचा मानस आहे. योग्य वयात मुलांच्या प्रतिभेला प्रोत्साहन आणि व्यासपीठ मिळाल्यास भविष्यात शहराचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल करणारे कलाकार घडू शकतात, या भूमिकेतून या उपक्रमांची आखणी केली जाणार आहे. यासोबतच शहरातील गुणवंत खेळाडू आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींनाही महोत्सवाशी जोडण्याचा प्रयत्न राहणार आहे.

“पिंपरी-चिंचवडमध्ये प्रतिभेची कमतरता नाही; गरज आहे ती या प्रतिभेला संधी आणि हक्काचे व्यासपीठ देण्याची. शहरातील कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी दुसऱ्या शहरांकडे पाहावे लागू नये, अशी सांस्कृतिक व्यवस्था आपल्याला आपल्या शहरात निर्माण करायची आहे. हा महोत्सव केवळ काही कार्यक्रमांपुरता मर्यादित न राहता कलाकार, बालकलाकार, खेळाडू, विद्यार्थी आणि प्रत्येक कलाप्रेमी पिंपरी-चिंचवडकराचा उत्सव व्हावा, ही आमची भूमिका आहे.

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील स्थानिक कलाकारांना विविध कार्यक्रमांमध्ये सादरीकरणाची संधी देण्यात आली होती. त्याला मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादानंतर आता या संकल्पनेला अधिक व्यापक स्वरूप देण्याचा प्रयत्न ‘पिंपरी-चिंचवड गणेश महोत्सव २०२६’च्या माध्यमातून करण्यात येणार आहे. शहरातील सांस्कृतिक चळवळीला सातत्य मिळावे, नवोदित कलाकारांना प्रोत्साहन मिळावे आणि शहराची स्वतंत्र सांस्कृतिक ओळख अधिक दृढ व्हावी, हा त्यामागील उद्देश आहे. “शहराचा विकास केवळ रस्ते, इमारती आणि पायाभूत सुविधांमधून होत नाही. शहराची खरी ओळख तेथील कला, संस्कृती, परंपरा आणि कलाकारांमधून घडत असते. पिंपरी-चिंचवडच्या या सांस्कृतिक वैभवाला राज्य आणि देशपातळीवर स्वतंत्र ओळख मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे,” असेही महापौर लांडगे यांनी नमूद केले.

महोत्सवाचे मुख्य संयोजक तथा आमदार अमित गोरखे म्हणाले, “पिंपरी-चिंचवड हे विविध संस्कृती आणि परंपरांचा सुंदर संगम असलेले शहर आहे. या शहरातील कला, परंपरा आणि नव्या पिढीतील प्रतिभेचे प्रतिबिंब या महोत्सवात दिसले पाहिजे. विशेषतः बालकलाकार, विद्यार्थी आणि नवोदित कलाकारांना मोठ्या व्यासपीठावर आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळावी, यावर आमचा भर राहणार आहे. ‘पिंपरी-चिंचवड महोत्सव’ शहराच्या सांस्कृतिक ओळखीला नवी उंची देणारा ठरेल.”

### महोत्सव व्हावा सर्वांचा सांस्कृतिक उत्सव!

महोत्सवाचे मुख्य संयोजक तथा विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर म्हणाले, “कला आणि संस्कृती ही समाजातील प्रत्येक घटकाला एकत्र आणणारी शक्ती आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये असंख्य गुणी कलाकार आहेत; मात्र प्रत्येक कलाकाराला आपल्या कलेसाठी मोठे व्यासपीठ मिळतेच असे नाही. या महोत्सवाच्या माध्यमातून अशा कलाकारांना संधी देऊन त्यांच्या कलेचा सन्मान करण्याचा आमचा प्रयत्न आहे. हा महोत्सव कोणत्याही एका व्यक्ती किंवा संस्थेचा न राहता संपूर्ण पिंपरी-चिंचवडकरांचा सांस्कृतिक उत्सव व्हावा, हीच आमची अपेक्षा आहे.”

---

# दहीहंडीतील अश्लील डान्सला लगाम! पोलिसांचा मंडळांना थेट इशारा!

**» पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड शहरात दहीहंडी उत्सवाची जोरदार तयारी सुरू असून विविध भागांत भव्य दहीहंडी सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाच्या उत्सवात अनेक नामांकित अभिनेते, अभिनेत्री आणि खेळाडू उपस्थित राहणार असल्याने कार्यक्रमस्थळी मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी विशेष खबरदारी घेत संपूर्ण उत्सवावर करडी नजर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.**




दहीहंडी उत्सवाच्या नावाखाली काही ठिकाणी होणारे अश्लील किंवा आक्षेपार्ह नृत्यप्रकार रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. विशेषतः सेलिब्रिटींच्या उपस्थितीत आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने नागरिकांची गर्दी होत असते. अशा वेळी अशोभनीय नृत्य, आक्षेपार्ह सादरीकरण किंवा सार्वजनिक ठिकाणी अनुचित प्रकार घडल्यास त्याचा परिणाम सामाजिक वातावरणावर होण्याची शक्यता असते. त्यामुळे यंदाच्या दहीहंडी उत्सवात अशा प्रकारांना कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

दहीहंडी उत्सवादरम्यान कोणत्याही मंडळाने अश्लील डान्स, आक्षेपार्ह सादरीकरण अथवा सार्वजनिक शांततेला बाधा आणणारे कार्यक्रम आयोजित केल्यास संबंधित आयोजकांना थेट जबाबदार धरले जाणार आहे. अशा आयोजकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला आहे. त्यामुळे उत्सवाचे आयोजन करताना मंडळांनी कार्यक्रमातील सादरीकरण, ध्वनिक्षेपकांचा वापर तसेच इतर नियमांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या आहेत.

उत्सव हा केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम न राहता आनंद, सांस्कृतिक परंपरा आणि सामाजिक एकतेचा संदेश देणारा असावा, अशी पोलिस प्रशासनाची भूमिका आहे. नागरिकांच्या भावना दुखावतील किंवा सामाजिक वातावरण बिघडेल, असे कोणतेही सादरीकरण टाळावे, असे आवाहनही आयोजकांना करण्यात आले आहे. तसेच कार्यक्रमादरम्यान कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झाल्यास पोलिसांकडून त्याची तात्काळ दखल घेऊन संबंधितांविरोधात आवश्यक ती कायदेशीर पावले उचलली जातील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

दरम्यान, दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील प्रमुख ठिकाणे, गर्दीची ठिकाणे आणि संवेदनशील भागांवर पोलिसांची विशेष नजर राहणार आहे. उत्सवाच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार संवेदनशील ठिकाणी अतिरिक्त पोलीस फौजाही नियुक्त केली जाणार आहे. गर्दीचे नियोजन, वाहतूक व्यवस्था आणि कार्यक्रमस्थळी सुरक्षेच्या दृष्टीनेही पोलिसांकडून विशेष उपाययोजना करण्यात येणार आहेत.

दहीहंडी उत्सव शांततापूर्ण, सुरक्षित आणि सांस्कृतिक मूल्यांचे जतन करणारा व्हावा, यासाठी आयोजकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या मंडळांवर कोणतीही तडजोड न करता कारवाई केली जाईल, त्यामुळे उत्सवाचे आयोजन करताना सर्व नियम व परवानग्यांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे.